**महाराष्ट्र शासन**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१**
**फोन नं.०२०-२५५१२८१३/२५५१३७६७/२५५१२८११, फॅक्स नं. ०२०-२५५१२८१२**
**ई-मेल** – estt4b@rediffmail.com, **वेबसाईट** – www.mahaagri.gov.in

**कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयातंर्गत गट-क संवर्गातील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे कृषि सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळ सेवेने भरावयाच्या पदाची जाहिरात सन २०१५ - २०१६**

जाहिरात क्रमांक :- जा.क्र.अेपीटी/१३१५/गट-क/प्र.क्र.७(भा-२)/आस्था-४/**११७७** /२०१५, दि.**२८/१२/ २०१५**

शासन निर्णय क्र.कृषिआ/२५०५/प्र.क्र.५८७/१६ए, दिनांक ९/२/२००७, साप्रवि शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३अ, दिनांक १९/१०/२००७, साप्रवि शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००५/प्र.क्र.४६/०७/१३अ, दिनांक २७/०६/२००८, शासन निर्णय क्र.साप्रवि, प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४) १३अ, दिनांक ५/६/२०१४, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २/६/२०१५ मधील तरतूदीचे अनुषंगाने तसेच शासन पत्र क्र.कृषिआ-१२१५/प्र.क्र-२८५/१६ए, दि. १५/१२/२०१५ नुसार कृषि विभागातील कृषि आयुक्तालयाचे अधिनस्त विभागीय कार्यालयांतर्गत खाली दर्शविलेप्रमाणे कृषि सहाय्यक या गट क संवर्गाच्या रिक्त पदांवर कृषि सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळसेवेने निवड प्रक्रियेव्दारे भरावयाच्या पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेले उमेदवार अर्ज करु शकतील. तसेच महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.शा.निर्णय क्र.मकसी-२००७/प्र.क्र.३६/का.३६, दि.१० जुलै २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या ८६५ गावातील रहिवाशी असलेले उमेदवार अर्ज करु शकतील.

**पदाचे नांव :- कृषि सेवक**

**१) विभागनिहाय उपलब्ध पदसंख्या**

| विभागीय कृषि सह संचालक | समांतर आरक्षण | खुला अराखीव | मागास वर्गीयासाठी राखीव पदाची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| पुणे (एकूण १५६ पदे) | | ८२ | २८ | ० | ४ | ४ | २२ | ९ | ७ | ० |
| | महिला | २५ | ८ | ० | १ | १ | ७ | ३ | २ | ० |
| | माजी सैनिक | १२ | ४ | ० | १ | १ | ३ | १ | १ | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ४ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | ४ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | अंशकालीन | ८ | ३ | ० | ० | ० | २ | १ | १ | ० |
| | सर्वसाधारण | २७ | १० | ० | २ | २ | ८ | ४ | ३ | ० |
| | विकलांग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -०२, श्रवणशक्तीतील दोष -०२,चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु -०१ | | | | | | | | |
| ठाणे (एकूण १८१ पदे) | | १११ | ७ | १७ | ७ | ४ | १ | २ | १ | ३१ |
| | महिला | ३३ | २ | ५ | २ | १ | ० | १ | ० | ९ |
| | माजी सैनिक | १७ | १ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ५ |
| | प्रकल्पग्रस्त | ६ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | भुकंपग्रस्त | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

www.mahaagri.gov.in

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खेळाडू | ६ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | अंशकालीन | ११ | १ | २ | १ | ० | ० | ० | ० | ३ |
| | सर्वसाधारण | ३६ | ३ | ५ | ३ | २ | १ | १ | १ | ९ |
| | विकलांग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -०२, श्रवणशक्तीतील दोष -०२,चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु -०१ | | | | | | | | |
| **नाशिक (एकूण ३१ पदे)** | | १० | ० | १९ | ० | ० | २ | ० | ० | ० |
| | महिला | ३ | ० | ६ | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | २ | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | १ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | सर्वसाधारण | ३ | ० | ६ | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | विकलांग | श्रवणशक्तीतील दोष -०१ | | | | | | | | |
| **कोल्हापूर (एकूण ८६ पदे)** | | ५५ | ४ | १५ | ० | १ | ० | ५ | ० | ६ |
| | महिला | १७ | १ | ५ | ० | ० | ० | २ | ० | २ |
| | माजी सैनिक | ८ | १ | २ | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | प्रकल्पग्रस्त | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | ६ | ० | २ | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | सर्वसाधारण | १७ | २ | ४ | ० | १ | ० | १ | ० | २ |
| | विकलांग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -०१, श्रवणशक्तीतील दोष -०२ | | | | | | | | |
| **औरंगाबाद (एकूण १०७ पदे)** | | ५२ | १३ | ११ | ० | १ | १ | २ | २ | २५ |
| | महिला | १६ | ४ | ३ | ० | ० | ० | १ | १ | ८ |
| | माजी सैनिक | ८ | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| | प्रकल्पग्रस्त | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भुकंपग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खेळाडू | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | अंशकालीन | ५ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | सर्वसाधारण | १६ | ४ | ३ | ० | १ | १ | १ | १ | ८ |
| | विकलांग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -०१, श्रवणशक्तीतील दोष -०१,चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु -०१ | | | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लातूर** (एकूण २२ पदे) | | ० | ८ | ० | ० | ० | १ | २ | ० | ११ |
| | महिला | ० | २ | ० | ० | ० | ० | १ | ० | ३ |
| | माजी सैनिक | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | अंशकालीन | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | सर्वसाधारण | ० | ४ | ० | ० | ० | १ | १ | ० | ३ |
| | विकलांग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -१ | | | | | | | | |
| **अमरावती** (एकूण ९ पदे) | | ५ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० |
| | महिला | २ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० |
| **नागपूर (एकूण १३८ पदे)** | | ६६ | २० | १० | ५ | ३ | ५ | ३ | ० | २६ |
| | महिला | २० | ६ | ३ | २ | १ | २ | १ | ० | ८ |
| | माजी सैनिक | १० | ३ | २ | १ | ० | १ | ० | ० | ४ |
| | प्रकल्पग्रस्त | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भुकंपग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खेळाडू | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | अंशकालीन | ७ | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | ३ |
| | सर्वसाधारण | २२ | ७ | २ | १ | २ | १ | २ | ० | ८ |
| | विकलांग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -०२, श्रवणशक्तीतील दोष -०१,चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू -०१ | | | | | | | | |

**२. सुचना –**

२.१) जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

२.२) समांतर आरक्षणांतर्गत महिला, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन कर्मचारी यांचेसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत. उर्वरीत पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणा व्यतिरिक्त आहेत. तसेच समांतर आरक्षणाबाबत शासन परीपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६अ,दिनांक १३/८/२०१४ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.३) विकलांग व्यक्तीसाठी आरक्षीत असलेल्या पदावर सरळसेवेने भरती करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्यांची निवड करण्यांत येईल व भरती केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या उपलब्ध सामाजिक प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

२.४) ज्या उमेदवारानी सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/प्रकल्प अधिकारी अदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड इ. कार्यालयामध्ये नावे नोंदविलेली आहेत. त्याच प्रमाणे ज्या उमेदवारांची सदर पदांसाठी सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस करण्यात आलेली आहे अशा उमेदवारांनीही या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच परिक्षेसाठीचे विहित शुल्क भरणे आवश्यक राहील. माजी सैनिक व विकलांग उमेदवारांना परीक्षा शुल्क लागू नाही.

२.५) उपरोक्त विज्ञापित पदाकरीता निश्चित वेतन/ आवश्यक शैक्षणिक अर्हता, अटी व शर्ती पुढील प्रमाणे राहील

| पद क्रमांक | पदाचे नांव | किमान शैक्षणीक अर्हता, वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | कृषि सेवक | १) वेतन : निश्चित वेतन रुपये ६०००/- प्रतिमाह.<br>२) शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण केलेली आहे असे उमेदवार.<br>३) निवड झालेल्या उमेदवारांची कृषि सेवक पदी प्रथमतः १ वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास पुन्हा १ वर्षाची नियुक्ती करण्यात येईल. याप्रमाणे कृषि सेवक पदी नियुक्तीचा कमाल कालावधी ३ वर्षाचा राहील. ३ वर्षाचा कालावधी समाधानकाररित्या पूर्ण केल्यानंतर पदांच्या उपलब्धते प्रमाणे व आवश्यकते प्रमाणे उमेदवारास कृषि सहाय्यकांच्या नियमित पदावर नियुक्ती देण्याचा विचार करण्यात येईल. |

**३) <u>वयोमर्यादा</u> -**

३.१) जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दि. **२९/१२/२०१५** रोजी गणले जाईल.

३.२) सर्वसाधारण उमेदवारांकरीता वय किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना उच्च वयोमर्यादा ५ वर्ष शिथीलक्षम राहील.

३.३) विकलांग, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, प्रकल्पग्रस्त, भुंकपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन, सन १९९१ चे जणगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी या उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहील. १९९१ चे जणगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांना समांतर आरक्षण नाही.

३.४) सा.प्र.वि.शासन शुध्दीपत्र क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ,दि.२०/०८/२०१० नुसार माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच विकलांग व्यक्तीसाठी, माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

**४) <u>महिला समांतर आरक्षण</u> -**

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८०/२००१/मसेआ/२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/०५/२००१ नुसार खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुंटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय रहाणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासप्रवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गटातील महिला सदस्यांना ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**५) भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त :-** भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**६) खेळाडू समांतर आरक्षण -**

६.१) खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

६.२) राज्य अजिक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या

www.mahaagri.gov.in

उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळांडूचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.

६.३) राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (एनसीसी) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेले उमेदवार.

६.४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांकःक्रीस्पर्धा-२१०८(प्र.क्र.४४०/०८)/क्रियुसे-२, दि.२०/०९/२०१३ मधील तरतूदीनुसार अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेमधील वैयक्तीक अथवा सांघिक क्रिडा प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कास्य पदक प्राप्त खेळाडू.

६.५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१७१४/प्र.क्र.३२५/क्रियुसे-२,दि २२/०४/२०१५ मधील तरतूदीनुसार आदिवासी विकास विभागाने आयोजीत केलेल्या राज्यस्तर शालेय क्रिडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणारे खेळाडू.

७) <u>**अंशकालीन समांतर आरक्षण**</u> -

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि२७/१०/२००९ अनुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट-क मधील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांमध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.त्यानुसार अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) **विकलांग** :- विकलांग या प्रवर्गातील उमेदवाराचे विकलांगतेचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग अप्रवि -२०१२ /प्र.क्र.२९७/आरोग्य ६ दिनांक ६/१०/२०१२ मधील आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९) <u>**परीक्षा शुल्क -**</u>

९.१) सर्वसाधारण (खुला प्रवर्गातील) उमेदवारांकरिता रुपये **४००**/- व मागासवर्गीयासाठी **रु.२००**/- परीक्षा शुल्क राहील. तसेच उमेदवारास बँक सेवाशुल्क प्रती चलन रुपये **२०**/- भरावे लागेल.

९.२) विहीत परिक्षा/सेवा शुल्क भारतीय स्टेट बँक, शाखा पुणे मेन ब्रँच यांचे कडील खाते क्रमांक **३११७८४५२५२४** किंवा स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद शाखा लक्ष्मीरोड पुणे यांचेकडील खाते क्रमांक **६२३७२५३०२४९** मध्ये चलनाव्दारे जमा करावे.

९.३) विहित परिक्षा शुल्क राज्यातील कोणत्याही भारतीय स्टेट बँकेच्या किंवा स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद बँकेच्या शाखेमध्ये चलनाव्दारे (९.२) मध्ये नमुद केलेल्या खाते क्रमांकावर जमा करता येईल.

९.४) विकलांग व्यक्तीसाठी व माजी सैनिक यांना परीक्षा शुल्क भरण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

१०) **ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना**

१०.१ प्रस्तुत पदभरतीसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. ऑफलाईन अर्ज स्विकारले जाणार नाही.

१०.२ सर्व विभागांमध्ये लेखी परीक्षा ही एकाच दिवशी व एकाच वेळेस होणार आहे.

१०.३ उमेदवाराने ज्या विभागासाठी अर्ज केला असेल, त्याच विभागासाठी उमेदवारास पात्रतेच्या अधिन राहून लेखी परिक्षेस बसता येईल व त्याच विभागासाठी गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

१०.४ वरील १०.२ व १०.३ मध्ये जरी नमुद केले असले तरी जर उमेदवाराला एका पेक्षा जास्त विभागामधून अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक विभागासाठी स्वतंत्रपणे शुल्क भरावे लागेल व त्यासाठी एकच USER NAME आणि PASSWORD चा वापर करता येईल.

१०.५ एकापेक्षा जास्त विभागांमध्ये अर्ज करणा-या उमेदवाराला अर्ज केलेल्या विभागाचे प्रवेशपत्र उपलब्ध होतील. परंतू उमेदवार ज्या विभागाच्या प्रवेशपत्रावर प्रविष्ठ होईल (परीक्षा देईल) त्याच विभागाचा अर्ज निवडीसाठी ग्राहय धरण्यात येईल याची उमेदवारानी नोंद घ्यावी.

१०.६ **पात्र उमेदवारांना वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahaagri.gov.in या वेबसाईटव्दारे दि. २९ / १२/२०१५ ते दि. १२/०१/२०१६ या कालावधीमध्ये सादर करणे आवश्यक राहील.**

१०.७ अर्ज करु इच्छिणाऱ्या अर्हताधारक उमेदवाराने अर्ज करण्यापुर्वी जाहिरातीतील सर्व माहिती व सुचनांचे बारकाईने वाचन करावे.

१०.८ उमेदवाराने कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या वेबसाईटवर जाऊन कृषि सेवक ऑनलाईन ॲप्लीकेशन या लिंकवर क्लिक करावे.

१०.९ online फॉर्म भरण्यासाठी उमेदवाराने आधी नवीन नोंदणी हया लिंकवर क्लिक करुन नवीन user name बनवून रजिस्टर करुन घ्यावा.

१०.१० user name व password आपण जो टाकला आहे त्याची प्रिंट काढून घ्यावी किंवा नोंद करुन ठेवावी.

१०.११ user name व password टाकून login बटनावर क्लिक करावे.

१०.१२ ज्या विभागासाठी आपणाला अर्ज करावयाचा आहे त्या विभागासमोरील "अर्ज भरा" या बटनावर क्लिक करावे.

१०.१३ आवेदन पत्रामध्ये पासपोर्ट फोटोची साईज (३.५ से. मि. X ४.५ से. मि.) पेक्षा जास्त नसावी व स्वाक्षरीची साईज (३.५ से. मि. X १.५ से. मि.) पेक्षा जास्त नसावी व ते JPEG हया फॉरमेट मध्ये स्कॅन करुन ठेवावी व त्याची साईज ५० KB पेक्षा जास्त असता कामा नये.

१०.१४ upload फोटो हया ठिकाणी select file हया बटनावर क्लिक करुन फोटो upload करावा.

१०.१५ upload signature हया ठिकाणी select file हया बटनावर क्लिक करुन signature upload करावी.

१०.१६ अर्जदाराने संपूर्ण माहिती इंग्रजी लिपीमध्येच सर्व चौकोनात अचूक भरावी.

१०.१७ ज्या ठिकाणी * असे चिन्ह आहे त्या चौकोनात माहिती भरणे अनिवार्य आहे.

१०.१८ उमेदवाराचे ओळखपत्र प्रकार - निवडणूक मतदार छाया चित्र ओळखपत्र / आधारकार्ड / पॅन कार्ड / वाहनचालक लायसन्स / राष्ट्रीयकृत बॅक पासबुक नुसार खाते क्रमांक / पासपोर्ट क्रमांक यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची निवड करुन त्याच्या क्रमांकाचा उल्लेख संगणकावर online आवेदन पत्रात नोंदवावा.

१०.१९ उमेदवाराची शैक्षणिक माहिती या मधील Education Detail या बटनावर क्लिक करुन आपली शैक्षणीक अर्हता add करावी.

१०.२० शेवटी Form Preview हया बटनावर क्लिक करावे. फॉर्म मध्ये आपण भरलेली माहिती अचूक आहे का वाचून खात्री करावी व ज्या ठिकाणी आपणास दुरुस्ती हवी असल्यास खाली दिलेल्या Edit Form या बटनावर क्लिक करुन योग्य ती दुरुस्ती करावी व पुन्हा Form Preview या बटनावर क्लिक करावे. जर फॉर्ममध्ये दुरुस्ती नसल्यास Submit Form हया बटनावर क्लिक करावे.

१०.२१ उमेदवाराने सर्व माहिती संगणकावरील अर्जात भरल्यानंतर ती Submit Form हया बटनावर क्लिक करण्यापूर्वी त्याची तपासून खात्री करावी व नंतरच Submit करावी. अर्ज Submit केल्यानंतर माहितीत बदल करता येणार नाही.

१०.२२ आपणाला Record Saved Successfull असा message येईल तेव्हाच आपला फॉर्म पूर्ण भरला गेला आहे असे समजावे.

१०.२३ विकलांग व माजी सैनिक उमेदवारांना परीक्षा शुल्क लागू नाही. म्हणून त्यांनी अर्ज पूर्ण भरून झाल्यानंतर अर्जाची प्रिंट काढता येईल.

www.mahaagri.gov.in

१०.२४ फॉर्म पुर्ण भरल्यानंतर "चलनप्रत" या बटनावर क्लिक करावे. आपणाला ज्या बँकेची शाखा जवळ आहे. (State Bank of India / State Bank of Hydrabad) त्या बँकेचे चलन प्रिंट करुन घ्यावे.

१०.२५ चलन बँकेत भरल्यानंतर पुन्हा user name व password ने login करुन पुन्हा challan update या बटनावर क्लिक करावे. त्या मध्ये आपणाला बॅकेने दिलेला Transaction ID व बॅकेत पैसे भरले आहेत त्या बँकेचा Branch code, Branch Name, बँकेत शुल्क रक्कम भरल्याचा दिनांक, बँकेत भरलेली शुल्क रक्कम व उमेदवाराचा चलनावरील आवेदनपत्र क्रमांक (Form number) भरुन Submit challan या बटनावर क्लिक करावे.

१०.२६ त्यानंतर आपणांस आवेदन पत्राची प्रिंट मिळेल.

१०.२७ चलनाची प्रत व आवेदनपत्र उमेदवाराने स्वतःजवळ सांभाळून ठेवावे.

१०.२८ सदर शुल्क हे ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**११) उमेदवाराची गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी निवड झाल्यानंतर संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल –**

११.१ शैक्षणीक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे संबंधित शासनमान्य संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्राची प्रत.

११.२ जन्मतारखे बाबतच्या पुराव्यादाखल्याच्या प्रमाणपत्राची प्रत

११.३ सक्षम प्राधिका-यांने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र.

११.४ महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतच्या सक्षम प्राधिका-यांन दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

११.५ प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची प्रत

११.६ लागू असल्यास सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची प्रत.

११.७ विकलांग व्यक्तीचे बाबतीत उपरोक्त अ.क्र.८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्राची प्रत.

११.८ परीक्षा शुल्क भरणा केलेल्या चलनाची प्रत व आवेदन पत्राची प्रत.

११.९ माजी सैनिक उमेदवाराने सशस्त्र दलात केलेल्या सेवेबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत.

११.१० अंशकालीन उमेदवारानी सुशीक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

११.११ खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकी करीता सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र प्रत.

११.१२ इतर अनुषंगीक आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रती.

११.१३ खालील दिलेल्या नमुन्यातील लहान कुटुंबाबाबतचे प्रमाणपत्र.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ

**प्रतिज्ञापत्र**

नमुना-अ (नियम-४ पहा)

मी श्री. / श्रीमती / कुमारी ..........................................................................

श्री.............................................. यांचा मुलगा / यांची मुलगी / यांची पत्नी वय ........ ... ....वर्ष, राहणार ..........................................................................

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी ..... .... ......... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला .....................(संख्या) इतकी हयात मुले आहे. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................. आहे. (असल्यास,जन्मदिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे यापदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :------------

दिनांक :------------ उमेदवाराची सही
(उमेदवाराचे नांवः........................................)

१२) **निवडीची पध्दत -**

| पद क्रमांक | पदाचे नांव | तपशिल |
|---|---|---|
| १ | कृषि सेवक | कृषि सेवक पदासाठी फक्त मराठी माध्यमातुन लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल.<br>लेखी परीक्षा २०० प्रश्नांची व २०० गुणांची घेण्यात येईल त्यासाठी दोन तासाचा कालावधी राहील . लेखी परिक्षा मराठी - २० प्रश्न, इंग्रजी -२० प्रश्न, सामान्यज्ञान -२० प्रश्न, बौध्दीक चाचणी - २० प्रश्न व कृषि विषयक - १२० प्रश्न, अशा एकूण २०० प्रश्नांची राहील. प्रत्येक प्रश्नास एक गुण राहील. परिक्षा शक्यतो त्या-त्या विभागाच्या मुख्यालयी घेण्यात येईल. प्रश्नपत्रीका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.<br><br>मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी या विषयाची काठिण्य पातळी ही एस. एस. सी. (इयत्ता १०वी)दर्जाची राहील व कृषि विषयाची काठिण्य पातळी ही कृषि पदविका दर्जाची राहील. |

१२.१) उपरोक्त पदासाठी घेण्यात येणारी लेखी परिक्षा सर्व विभागामध्ये एकाच दिवशी एकाच सत्रात संबंधित विभागाच्या मुख्यालयी घेण्यात येईल.

१२.२) पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र व परिक्षेविषयी आवश्यक सुचना ऑनलाईन व एसएमएसद्वारे कळविण्यात येईल व संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन डाउनलोड करावीत. लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता यादी गुणानुक्रमे व प्रवर्गनिहाय तयार करुन कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

१२.३) शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८ नुसार जे उमेदवार लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येईल.

१२.४) उमेदवारास समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २७/०६/२००८ व ०५/१०/२०१५ मधिल तरतुदीनुसार निवड प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येईल.

१२.५) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी आवश्यक मुळ कागदपत्रांची तपासणी संबंधित विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाकडून करुनच नियुक्ती देण्यात येईल. पडताळणीत चुकीची अथवा खोटी माहिती आढळून आल्यास त्या टप्प्यावर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१२.६) लेखी परीक्षेसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२.७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२/ दि.१८/०३/२०१४ मधील तरतुदीनुसार अंधत्व किंवा क्षीणदृष्टी,चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु याने बाधीत असलेली व्यक्ती, लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना परिक्षेसाठी लेखनिक पुरविण्याबाबतची व्यवस्था करण्यात येईल. तशी मदत आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. उमेदवार स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार आहे किंवा उमेदवाराला परिक्षा आयोजित करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे, तसा विनंती अर्ज वरील अनुक्रमांक १ मध्ये नमुद केलेल्या संबंधित विभागीय कृषि सह संचालक कार्यालयाकडे लेखी स्वरुपात आठ दिवस आधी सादर करणे आवश्यक राहिल. अर्जदार लेखनिक

www.mahaagri.gov.in

स्वतः घेवून येणार असेल तर लेखनिकाचे शैक्षणिक अर्हता, परिक्षेतील गुण व अन्य बाबीबाबत कोणतेही निर्बंध असणार नाहीत. काही अपवादात्मक परिस्थितीत परिक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

१२.८) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशासन-२०००/प्र.क्र.५/२००१/३२,दि.२०/०७/२००२ व अनुषंगीक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरीता अर्ज करणार्‍या उमेदवारांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे खाली अ किंवा ब येथे नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल. मात्र शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान(सामान्य प्रशासन) विभाग क्र.मातंस-२०१२/ प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ मधिल परिच्छेद १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

ब) महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MSC-IT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

१३) **इतर अटी व शर्ती** -

१३.१) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१३.२) उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या आवेदनपत्रातील माहितीच्या आधारे लेखी परिक्षेस बसण्यास तात्पुरती परवानगी देण्यात येईल व निवड झाल्यानंतर प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जातील माहिती अपुर्ण अथवा चुकीची आढळून आल्यास उमेदवाराची निवड त्या टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१३.३) मागासवर्गीयांसाठी असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्यांसाठी लागू राहील व सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे आवश्यक राहील. तसेच वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास सादर करावे.

१३.४) अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त विजा-अ, भज-ब, भज-ड तसेच इतर मागास आणि विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागु करण्यात आले असल्याने, त्याबाबतची प्रमाणपत्रे (नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र) (सन २०१५-१६ साठी वैध असलेले) सादर केल्याशिवाय नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

१३.५) माजी सैनिक या आरक्षीत पदासाठी उमेदवार स्वतः माजी सैनिक असावा. सामाजिक आरक्षणांतर्गत असलेले महिला, खेळाडू, माजी सैनिक व अंशकालीन कर्मचारी या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे, त्या-त्या सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

१३.६) उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबधीत पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चूकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना / नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वतः जबाबदार राहील.

**१३.७) लेखी परीक्षा केवळ मराठी माध्यमातून घेतली जाईल.**

१३.८) नियुक्तीस पात्र ठरलेल्या मागासप्रवर्गातील उमेदवारांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार नियुक्तीपासून सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१३.९) नियमित नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारास नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१३.१०) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये उमेदवारांनी दि.२८/०३/२००५

रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत **मुद्दा क्र. ११.१३** मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार यांना हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी उमेदवार निवडीस / नियुक्तीस अपात्र ठरविला जाईल.

१३.११) अ) शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७/०६/२०११ नुसार ज्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास, त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास , त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची अट लागू असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारासाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

१४) निवड प्रक्रियेच्या संदर्भात सर्व अधिकार संबंधित निवड समितीने राखून ठेवले आहे.

१५) निवड प्रक्रियेच्या संदर्भात समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१६) **ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक १२/०१/२०१६ असून त्या दिनांकास रात्री २३.५९ वाजता ऑनलाईन अर्ज स्विकृती बंद करण्यात येईल.**

१७) सदरची जाहिरात कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**पुणे** - ४११ ००१
**दिनांक : २९ डिसेंबर २०१५**

स्वाक्षरीत/-
(**विकास देशमुख**)
**आयुक्त कृषि,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**

www.mahaagri.gov.in